# Distribution of prizes for the 13th All-India Police Shooting Contest 2019 At Dated 17/01/2020

सकाळ TODAY
शुक्रवार, १७ जानेवारी २०२० १०

पी.सी.डब्ल्यू./०६१/२०१८-२०२०.

## मिलान खान, किरणदीप कौरला सुवर्णपदक

**पुणे, ता. १६ :** पिंपरी चिंचवड आयुक्तालय व महाराष्ट्र पोलिस आयोजित तेराव्या अखिल भारतीय पोलिस नेमबाजी स्पर्धेत पुरुषांच्या ५० मीटर फ्री रायफल ३ पोझीशन प्रकारात सीआरपीच्या मिलान खान, तर महिलांच्या दहा मीटर एअर पिस्टल प्रकारात पंजाबच्या किरणदीप कौरने सुवर्णपदक पटकावले.

श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात सुरू असलेल्या या स्पर्धेत पुरुषांच्या ५० मीटर फ्री रायफल तीन पोझीशन प्रकारात सीआरपीच्या मिलान खानने सुवर्णपदक पटकावले. बीएसएफच्या विमलेश कुमार राठोरने रौप्य, तर सीआरपीच्या रितेश तन्वरने ब्रॉंझपदकाची कमाई केली.

महिलांच्या दहा मीटर एअर पिस्टल प्रकारात पंजाबच्या किरणदीप कौरने विक्रमी ५६७ गुण मिळवत सुवर्णपदक पटकावले. एसएसबीच्या रमणदीप कौरने रौप्य, तर बीएसएफच्या नीरज कौरने ब्रॉंझपदक पटकाविले. या पदकांचे वितरण अतुलचंद्र कुलकर्णी, सतीश शहा, पवन कुमार यांच्या हस्ते झाले.

४ MY पुणे शुक्रवार, १७ जानेवारी २०२०

SPORTS

## मिलान खान, किरणदीप कौर यांना सुवर्णपदक

**अखिल भारतीय पोलिस नेमबाजी स्पर्धा**

**पुणे : प्रतिनिधी**

**१३ व्या अखिल भारतीय पोलादी (क्रीडा) स्पर्धेत पुरुषांच्या ५० मीटर फ्री रायफल ३ पोझिशन प्रकारात सीआरपीच्या मिलान खान यांना तर महिलांच्या १० मीटर एअर पिस्टल प्रकारात पंजाबच्या किरणदीप कौरने सुवर्णपदक पटकावले.**

महाराष्ट्र पोलिस यांच्या वतीने ही स्पर्धा श्री शिवछत्रपती क्रीडासंकुल येथे सुरू आहे. या स्पर्धेत पुरुषांच्या ५० मीटर फ्री रायफल ३ पोझिशन प्रकारात सीआरपीच्या मिलान खानने सर्वाधिक ५७२.२२ एक्स गुण मिळवत सुवर्णपदक पटकावले. बीएसएफच्या विमलेश कुमार राठोरने ...७ गुणांसह रौप्य, तर सीआरपीच्या ...ने ५७२.१६ एक्स गुणांसह कांस्यपदकाची कमाई केली. सांघिक गटात बीएसएफ संघाने १७११ गुणांसह सुवर्णपदक पटकावले. यात विमलेश कुमार राठोरने ५७२, झुलन मोडकने ५७० व अनिल कुमारने ५६९ गुण मिळवले. सीआरपी संघाने १७०५ गुणांसह रौप्य तर एसएसबी संघाने १६९९ गुणांसह कांस्यपदक पटकावले.

महिलांच्या १० मीटर एअर पिस्टल प्रकारात पंजाबच्या किरणदीप कौरने विक्रमी ५६७ गुण मिळवत सुवर्णपदक पटकावले. किरणदीपने गत वर्षीचा ५६५ गुणांचा एसएसबीच्या योगिताचा विक्रम मोडत ही सुवर्ण कामगिरी केली. एसएसबीच्या रमणदीप कौरने ५६३.१७ एक्स गुणांसह रौप्य तर बीएसएफच्या नीरज कौरने ५६३.१२ एक्स गुणांसह कांस्य पदक कमावले.



१० मीटर एअर पिस्टल प्रकारातील ब्रॉंझपदक विजेते महाराष्ट्राचे खेळाडू.

सांघिक गटात पंजाब संघाने १६८२ गुणांसह सुवर्णपदक पटकावले.

यात हरवीन सारओने ५५८, रुबी तोमरने ५५७ तर करणदिप कौरने ५६८ गुण मिळवले. सीआरपी संघाने १६७२ गुणांसह रौप्य तर महाराष्ट्र संघाने १६६४ गुणांसह कांस्य पदक पटकावले. यात रश्मी यावडेने ५६३, ऋजा रेड्डीने ५५९ व वैशाली गोडगेने ५४२ गुणांची कमाई केली.

महिलांच्या सांघिक ५० मीटर फ्री रायफल प्रोन प्रकारात पंजाब संघाने १८४०.६ गुणांसह सुवर्ण पदक पटकावले. यात अंजूम मुद्गीलने ६२५.०, अमप्रीत कौरने ६०७.९ तर हजनीने ६०७.७ गुण मिळवले. आयटीबी संघाने १८३१.८ गुणांसह रौप्य व एसएसबी संघाने १८२८.१ गुणांसह कांस्यपदक पटकावले. स्पर्धेचे पदक वितरण अप्पर पोलिस महासंचालक अतुलचंद्र कुलकर्णी, कलाकार व शार्पशूटर सतीश शहा, आंतरराष्ट्रीय नेमबाज पवनकुमार यांच्या हस्ते करण्यात आले.

शेवटचं पान
सामना
पुणे, शुक्रवार,
दि. १७ जानेवारी २०२०

# मिलान खान, किरणदीप कौर यांना सुवर्ण

## राष्ट्रीय पोलीस नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धा

पुणे : महाराष्ट्र पोलीस यांच्या वतीने १३व्या अखिल भारतीय पोलीस नेमबाजी (क्रीडा) स्पर्धेत पुरुषांच्या ५० मीटर फ्री रायफल ३ पोझिशन प्रकारात सीआरपीच्या मिलान खानने, तर महिलांच्या १० मीटर एअर पिस्टल प्रकारात पंजाबच्या किरणदीप कौरने सुवर्णपदक पटकावले.

बालेवाडीतील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात सुरू असलेल्या या स्पर्धेत पुरुषांच्या ५० मीटर फ्री रायफल ३ पोझिशन प्रकारात सीआरपीच्या मिलान खानने सर्वाधिक ५७२, २२X गुण मिळवत सुवर्णपदक पटकावले, बीएसएफच्या विमलेश कुमार राठोरने ५७२, २०X गुणांसह रौप्य, तर सीआरपीच्या रितेश तन्वरने ५७२, १६X गुणांसह कांस्यपदकाची कमाई केली. सांघिक गटात बीएसएफ संघाने १७११ गुणांसह सुवर्णपदक पटकावले. यात विमलेश कुमार राठोरने ५७२, झुतन मोडकने ५७० व अनिल कुमारने ५६९ गुण मिळवले. सीआरपी संघाने १७०५ गुणासह रौप्य, तर एसएसबी संघाने १६९६ गुणांसह कांस्यपदक पटकावले. महिलांच्या १० मीटर एअर पिस्टल प्रकारात पंजाबच्या किरणदीप कौरने विक्रमी ५६७ गुण मिळवत सुवर्णपदक पटकावले. कुरणदीपने गतवर्षीचा ५६५ गुणांचा एसएसबीच्या योगिताचा विक्रम मोडत ही सुवर्ण कामगिरी केली. एसएसबीच्या रमणदीप कौरने ५६३,१७X गुणांसह रौप्य, तर बीएसएफच्या नीरज कौरने ५६३,१२X गुणांसह कांस्यपदक कमावले. सांघिक गटात पंजाब संघाने १६८२ गुणांसह सुवर्णपदक पटकावले.

१० महाराष्ट्र टाइम्स । पुणे । शुक्रवार, १७ जानेवारी २०२०

# नेमबाजी स्पर्धेत महाराष्ट्राला ब्रॉंझ

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पंजाबने तेराव्या अखिल भारतीय पोलिस नेमबाजी स्पर्धेतील महिलांच्या सांघिक १० मी. एअर पिस्तूलमध्ये सुवर्ण पटकावले, तर 'सीआरपी' आणि महाराष्ट्राला अनुक्रमे रौप्य आणि ब्रॉंझपदकावर समाधान मानावे लागले.

शिवछत्रपती क्रीडानगरी आणि वडाची वाडी येथे ही स्पर्धा सुरू आहे. महिलांच्या सांघिक १० मी. एअर पिस्तूलमध्ये पंजाबने १६८२ गुणांसह सुवर्ण पटकावले. विजेत्या संघात हरवीन साराओ, रूबी तोमर आणि किरणदीप कौर यांचा समावेश आहे. 'सीआरपी'ने १६७२ गुणांसह रौप्य मिळविले. या संघात साक्षी डागर, पुष्पांजली राणा आणि रचना देवी यांचा समावेश आहे. महाराष्ट्राने १६६४ गुणांसह ब्रॉंझ मिळविले. या ब्रॉंझविजेत्या संघात रश्मी धावडे, ऋतुजा रेड्डी आणि वैशाली गोडगे यांचा समावेश आहे.



महिलांच्या सांघिक १० मी. एअर पिस्तूलमध्ये ब्रॉंझ मिळविणाऱ्या रश्मी धावडे, ऋतुजा रेड्डी आणि वैशाली गोडगे.

महिलांच्या वैयक्तिक १० मी. एअर पिस्तूलमध्ये किरणदीपकौरने विक्रमासह सुवर्ण पटकावले. किरणदीपने ५६७ गुणांची नोंद केली. तिने 'एसएसबी'च्या योगिताचा विक्रम मोडला. गेल्या वर्षी योगिताने ५६५ गुणांची नोंद करत विक्रम नोंदविला होता. 'एसएसबी'च्या रमनदीपकौरने (५६३) रौप्य, तर 'बीएसएफ'च्या नीरजकौरने ब्रॉंझ मिळविले. पुरुषांच्या ५० मी. रायफल श्री पोझिशनमध्ये 'सीआरपी'च्या मिलन खानने ५७२ गुणांसह सुवर्णवेध घेतला. 'बीएसएफ'च्या विमलेशकुमार राठोड आणि 'सीआरपी'च्या रितेश तंवर यांनी अनुक्रमे रौप्य आणि ब्रॉंझ मिळविले. पदकविजेत्यांना अतिरिक्त पोलिस महासंचालक अतुलचंद्र कुलकर्णी, अभिनेते सतीश शहा आणि आंतरराष्ट्रीय नेमबाजी पवनकुमार यांच्या हस्ते गौरविण्यात आले.